**नियमीत दिवाणी दावा क्र.८/२०१३ मधील**

**अर्ज नि.क्र.१०३ खालील आदेश**

**[ CNR No. MHWS050003252013 ]**

१) प्रतिवादी क्र.१ ते ३ तर्फे त्यांचा लेखी जबाब निशाणी क्र १५ यामध्ये दुरुस्ती करणेसाठी सदरचा दुरुस्तीचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ चा आदेश ६, नियम १७ नुसार दाखल केलेला आहे.

२) प्रस्तुतचा अर्ज वाचला. त्यास वादी यांचेतर्फे दाखल केलेले लेखी म्हणने निशाणी क्र १०५ विचारात घेतले. प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी यांनी दिनांक २९.११.२०२३ रोजी दाखल केलेला आहे व त्यास वादीच्या विधीज्ञांनी दिनांक ०८.०१.२०२४ रोजी त्यांचे म्हणने दिलेले आहे. प्रतिवादी क्र.१ ते ३ यांच्या विधीज्ञांनी दिनांक ०२.०८.२०२५ रोजी त्यांचा युक्तीवाद केलेला आहे. परंतु वादी यांच्या विधीज्ञांनी दिनांक २१.०८.२०२५, १५.०९.२०२५, ३०.०९.२०२५, २८.१०.२०२५ आणि २७.११.२०२५ या तारखांना पुरेशी मुदत मिळुनही युक्तीवाद केलेला नाही. त्यामुळे प्रस्तुतचा दुरुस्तीचा अर्ज हा वादींच्या युक्तीवादाशिवाय गुणदोषावर निकाली काढण्यात येत आहे.

३) प्रतिवादी क्र.१ ते ३ यांचे तर्फे विधीज्ञ श्री. व्ही. ए. बेलाकार यांचा आणि वादींचे लेखी म्हणने निशाणी १०५ हे विचारात घेतले असता, माझे विचारार्थ खालील मुद्दा निघाला व त्यावरील निष्कर्ष कारणमिमांसेसहीत मी खालीलप्रमाणे देत आहे,

| अ.नं. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १] | प्रतिवादी क्र.१ ते ३ यांनी लेखी जबाबमधील मागणी केलेली दुरूस्ती/सुधारणा ही वाद मिळकतीबाबतचा खराखुरा प्रश्न निर्णीत करणेसाठी आवश्यक आहे, हे सिध्द केले आहे काय ? | .... होकारार्थी |
| २] | काय आदेश ? | .... अंतिम आदेशाप्रमाणे |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्र.१ बाबत :-**

४) प्रतिवादी क्र.१ ते ३ यांच्या विधीज्ञांनी असा युक्तिवाद केला की, वादींनी

प्रस्तुतचा दावा वाटणीसाठी व त्यांच्या क्षेत्राचा स्वतंत्र ताबा मिळण्यासाठी दाखल केलेला आहे. प्रतिवादी यांनी त्यांच्या लेखी जबाबामध्ये वाद मालमत्ता सर्वे नं ३६/२ ही मयत गोपाळराव बरगट यांनी मुत्यूपत्राद्वारे दिली असे नमुद केले आहे. वादींनी प्रतिवादी यांना ते मुत्यूपत्र सादर करण्यासाठी अर्ज दिला त्यानंतर प्रतिवादींना मुत्यूपत्राचा लेख मिळाला व त्यामध्ये असे आढळून आले की, वाद मालमत्ता सर्वे नं ३६/२ सह सर्वे नं ६/४ मधील १ हे. ६० आर जमिन. ग्राम पंचायत हददीतील वार्ड क्र ३ मधील बांधलेले जुने राहते घर क्र ३८१ आणि ५५८ या मालमत्ता सुध्दा दिलेल्या आहेत. त्यामुळे प्रतिवादी यांना त्यांच्या लेखी जबाबातील परिच्छेद क्र १३ मध्ये दुस–या ओळीत नमुद सर्वे नं ३६/२ या वाक्यापुर्वी अर्जात नमुद केल्याप्रमाणे, परिच्छेद क्र १३ मध्ये दुस–या ओळीमध्ये नमुद सर्वे न ३६/२ या वाक्यानंतर अर्जात नमुद केल्याप्रमाणे दुरुस्ती करावयाची आहे. उपरोक्त नुसार दोन ठिकाणी दुरुस्ती करण्यासाठी प्रस्तुतचा लेखी जबाबामध्ये दुरुस्ती करण्यासाठीचा अर्ज दिलेला आहे. प्रतिवादींना लेखी जबाब दाखल करतेवेळी ते मुत्यूपत्र सापडले नव्हते आणि वादींची मुत्यूपत्र दाखल करण्याची नोटीस निशाणी क्र १०१ मिळाल्यानंतर प्रतिवादीं यांनी कागदपत्राची निशाणी क्र १०७ अन्वये दिनांक ०६.०३.१९९७ रोजीचे मुळ मुत्यूपत्राचा लेख दाखल केलेला आहे. त्या दुरुस्तीमुळे वादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. तरी प्रतिवादी क्र. १ ते ३ यांचा प्रस्तुतचा लेखी जबाबातील दुरुस्तीचा अर्ज मंजूर करणेत यावा.

५)        याउलट वादी यांचे विधीज्ञांनी असे लेखी म्हणने दिले आहे की, प्रतिवादी क्र १ ते ३ यांनी केवळ त्यांचा लेखी जबाब दाखल केलेला आहे व त्या लेखी जबाबासोबत कोणताही कागदोपत्री पुरावा दाखल केलेला नाही. प्रस्तुतच्या दाव्यापुर्वी वादींनी कायम मनाईसाठी दावा दाखल केला होता व त्या दाव्यामध्ये प्रतिवादी यांनी ती मिळकत मयत गोपाळ बरगट यांच्या मुत्यूपत्राच्या आधारे मिळालेली आहे असा लेखी जबाब दाखल केला होता परंतु त्या दाव्यात प्रतिवादींनी ते मुळ मुत्यूपत्र दाखल केले नाही. या दाव्यात मुददे काढलेले आहेत आणि वादींनी त्यांचा पुरावा सुध्दा दिलेला आहे परंतु प्रतिवादी यांनी वादीचा उलटतपास घेतलेला नाही. प्रतिवादी यांनी बनावट व खोटे मुत्युपत्र तयार केलेले आहे. प्रतिवादी हे त्या मुत्यूपत्राच्या आधारे त्यांच्या लेखी जबाबातील बचावापेक्षा विरुध्द बचाव घेउ इच्छीत आहेत प्रतिवादी यांनी या दाव्याचे कागकाज लांबविण्यासाठी प्रस्तुतचा दुरुस्तीचा अर्ज दिलेला आहे त्यामुळे प्रस्तुतचा दुरुस्ती अर्ज नामंजुर करण्यात यावा.

६) अभिलेखाचे अवलोकन केले असता असे निदर्शनास येते की, वादींनी प्रस्तुतचा दावा वाटपासाठी व त्यांच्या स्वतंत्र क्षेत्राचा ताबा मिळण्यासाठी दाखल केलेला आहे. प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी त्यांचा लेखी जबाब नि.क्र. १५ हा दि. ०४.०५.२०१३ रोजी दाखल केलेला आहे व त्या लेखी जबाबातील परिच्छेद क्र १३ मध्ये मयत गोपाळराव यांनी सर्वे नं ३६/२ ही मिळकत शरद यांच्या नावे दिलेली आहे, असे नमुद केलेले आहे. म्हणजेच यावरुन हे स्पष्ट होते की, प्रतिवादी क्र १ ते ३ यांनी लेखी जबाब दाखल करतेवेळी त्यांना मयत गोपाळराव यांच्या दिनांक ०६.०३.१९९७ रोजीच्या मुत्युपत्राची माहिती होती

७) सध्या प्रस्तुतचा दावा प्रतिवादी यांच्यातर्फे वादींचे साक्षीदार क्र. १ सौ. लता उर्फ ललिता दत्तात्रय हिवलेकर यांचा उलटतपास घेण्यासाठी प्रलंबीत आहे. या परिस्थीतीत प्रतिवादी क्र. १ ते ३ यांच्या विधिज्ञांचा युक्तीवाद की, वादींतर्फे मुत्यूपत्र हजर करण्याची नोटीस निशाणी क्र १०१ दिल्यानंतर प्रतिवादींनी ते दिनांक ०६.०३.१९९७ रोजीचे मुळ मृत्यूपत्र या दाव्यात दाखल केले आहे. त्यामुळे प्रतिवादी यांनी प्रस्तुतचा दुरुस्तीचा अर्ज दिलेला आहे, या युक्तीवादात तथ्य दिसून येते.

८) प्रतिवादी क्र १ ते ३ यांनी त्यांचा लेखी जबाब निशाणी क्र १५ हा दिनांक ०४.०५.२०१३ रोजी दाखल केलेला आहे व प्रतिवादी क्र १ ते ३ यांनी मुळ मुत्यूपत्र दिनांक २९.११.२०२३ रोजीच्या अर्ज निशाणी क्र १०४ नुसार दाखल केलेले आहे. प्रतिवादी यांनी त्यांच्या दिनांक ०४.०५.२०१३ रोजीच्या लेखी जबाबानंतर प्रस्तुतचा दुरुस्तीचा अर्ज दिनांक २९.११.२०२३ रोजी दिलेला आहे. यावरुन असे दिसुन येते की, प्रतिवादी यांनी त्यांचा लेखी जबाब दाखल केल्यानंतर जवळपास १२ वर्षे ६ महिने २५ दिवस इतक्या उशिराने लेखी जबाबामध्ये दुरुस्ती करण्याचा अर्ज दिलेला आहे. हे सर्वज्ञात आहे की, केवळ दुरुस्तीचा अर्ज देण्यास विलंब झाला या कारणामुळे दुरुस्तीचा अर्ज नाकारता येऊ शकत नाही तर तो झालेला विलंब काही खर्च आकारुन माफ करता येऊ शकतो.

९) उपरोक्त सर्व परिस्थिती आणि प्रतिवादीं क्र. १ ते ३ यांच्या विधीज्ञांचा युक्तीवाद विचारात घेतला तर प्रस्तुतच्या दुरूस्तीच्या अर्जात नमूद केलेली दुरूस्ती ही प्रस्तुतच्या दाव्यातील खराखुरा प्रश्न निर्णीत करणेसाठी आवश्यक आहे व तसे प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी प्रथमदर्शनी सिध्द केलेले आहे आणि प्रतिवादी क्र. १ ते ३ यांच्या विधीज्ञांच्या त्या उपरोक्त युक्तीवादात तथ्य दिसून येते. प्रस्तुतच्या दुरूस्तीमुळे या लेखी जबाबाचे स्वरुप

बदलणार नाही. त्यामुळे प्रस्तुतच्या दुरुस्तीच्या अर्जास दिवाणी प्रक्रीया संहिता, १९०८ मधील आदेश ६ नियम १७ च्या परंतुक (proviso) ची बाधा येणार नाही. त्यामुळे उपरोक्त सर्व परिस्थिती विचारात घेवून मी मुद्दा क्र.१ चा निष्कर्ष होकारार्थी देवून न्यायाच्या दृष्टीने खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे,

## आदेश

१] सदरचा प्रतिवादी क्र. १ ते ३ यांचा लेखी जबाब निशाणी क्र १५, यामध्ये दुरुस्ती करण्यासाठीचा दिलेला प्रस्तुतचा अर्ज नि.क्र. १०३ हा रक्कम रुपये ५०००/– च्या खर्चावर मंजूर करण्यात येत आहे.

२] प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी उपरोक्त नुसार ची खर्चाची रक्कम वैयक्तिकरित्या अथवा संयुक्तिकरित्या वादी यांना दिल्यानंतरच अर्जात नमुद केलेली दुरुस्ती लेखी जबाबामध्ये करावी.

३] दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ चा आदेश ६, नियम १८ नुसार प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी अर्जात नमूद केलेप्रमाणेची दुरूस्ती आजपासून १४ दिवसांच्या आत करावी आणि दुरूस्त लेखी जबाबाची प्रत त्वरीत मुदतीत दाखल करावी.

४] दुरूस्त लेखी जबाबाची प्रत दाखल केल्यानंतर, त्या तारखेपासून १५ दिवसांच्या आंत वादी यांनी त्यांना त्यांच्या दावा नि.क्र.१ यामध्ये परिणामकारक दुरूस्ती [consequential amendment] करावयाची असल्यास त्याबाबतचा दाव्यामध्ये दुरुस्ती करण्यासाठीचा अर्ज द्यावा, अन्यथा दुरुस्ती करावयाची नसल्यास तशी पुरसीस दाखल करावी.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by HAMBIRE DHANANJAY BHAGWANRAO
Date: 2026.01.01 13:02:12 +0530

स्थळ : मंगरुळपीर.
दिनांक : ०१/०१/२०२६.

( ध. भ. हंबीरे )
दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,
मंगरुळपीर.

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/order are same, word to word, as per the original Judgment/order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | C.R.Gadge |
| Name of Court | : | Shri. D. B. Hambire, C.J.S.D.,Mangrulpir |
| Date of Decision | : | 01.01.2026 |
| Order signed by the P.O. on | : | 01.01.2026 |
| Order uploaded on | : | 01.01.2026 |